क्रमांक :- प्राशिसं/शापोआ/अंमल/२०१२-१३/३०३/९६

दिनांक : २०/०१/२०१३

प्रति,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

जिल्हा परिषद (सर्व)

२. शिक्षणाधिकारी

बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

विषय : शालेय पोषण आहार योजना

विषबाधा झाल्यास तात्काळ उपचार उपलब्ध होतील याची दक्षता घेणे आणि त्यासंबंधिचा चौकशी अहवाल सात तासात सादर करणे.

शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. राज्यामध्ये ही योजना १ ली ते ५ वी व इ. ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. केंद्र शासनाच्या निकषानुसार २ सदरची योजना केंद्र व राज्य शासनाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी संस्थांच्या अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा मदरसा / मक्तबा व राष्ट्रीय बाल कामगार शाळेतील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे.

वरील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अमंलबजावणी होणे आवश्यक आहे. सदर योजनेची अमंलबजावणी होत असताना जिल्हा स्तरावरफन लोकप्रतिनिधी सघंटना, प्रसारमाध्यमे, पालक वर्ग, इत्यादी कडून शालेय पोषण आहाराबाबत वारंवार तक्रारी संचालनालयाकडे येत असतात.

सदर तक्रारी कमी करण्यासाठी :-

१. आहाराचा दर्जा व गुणवत्ता यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

२. शाळांमध्ये भरारी पथकांद्वारे आकस्मीक भेट देणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक विद्यार्थ्यांची सुरक्षितता व आरोग्याच्या दृष्टीन काळजी घेणे आवश्यक आहे.

नागरी व ग्रामीण भागामध्ये शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी होत आहे याबाबत शाळा व्यवस्थापन समितीवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बचत गट व स्वंयसेवी संस्थामार्फत आहार शिजवून दिला जात असताना बऱ्याच ठिकाणी स्वच्छता व इतर बाबींची दक्षता न घेतल्याने काही ठिकाणी शालेय पोषण आहारामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या घटना घडतात.

शालेय पोषण आहार शिजवून देताना विद्यार्थ्यांस कोणतीही बाधा होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सर्व संबधिताना आपल्या स्तरातून तात्काळ सूचना द्याव्यात

विनाविलंब विद्यार्थ्यांना रुणालयात उपचारांसाठी दाखल करावे आणि घटनेची तात्काळ पाहणी करावी व सात तासात वस्तुस्थितीदर्शक चौकशी अहवाल शासनास व संचालनालयास सादर करावा.

महावीर माने

शिक्षण संचालक (प्राथमिक)

**टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८**